RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ९, अंक १२०] मंगळवार, सप्टेंबर ५, २०२३/भाद्रपद १४, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ सप्टेंबर २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि-२०२३/प्र.क्र. ८२/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ७१ ची पोट-कलमे (९), (२०) व (२२) आणि कलम ७२ चे पोट-कलम (१०) तसेच कलम ११ चे पोट-कलम (२) व (१४) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, विद्यापीठाच्या कुलगुरूच्या सेवेच्या अटी व शर्ती यांच्याशी संबंधित असणारे पुढील एकरूप परिनियम, विहित करीत आहे :—

**२०२३ चे एकरूप परिनियम क्रमांक ०४**

१. **संक्षिप्त नाव, प्रारंभ व प्रयुक्ती.**—(१) या परिनियमांस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कुलगुरूच्या सेवेच्या अटी व शर्ती) एकरूप परिनियम, २०२३ असे म्हणावे.

(२) ते दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ पासून अंमलात येतील.

(३) ते, या परिनियमांच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर नियुक्ती केलेल्या कुलगुरूस लागू असतील.

२. **रजा.**—(१) कुलगुरू महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८२ च्या वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे, त्याच्या पदावधीत अर्जित रजा, वैद्यकीय कारणास्तव परिवर्तित रजा व नैमित्तिक रजा मिळण्यास हक्कदार असेल.

(२) त्याच्या पदावधीत वापर न केलेल्या संचित अर्जित रजा, रोखीकरण करण्यासाठी विचारात घेण्यात येतील.

(३) कुलपती हा, कुलगुरूसाठी रजा मंजूर करणारा प्राधिकारी असेल.

३. **कुलगुरूला पदावरून दूर करण्याची कार्यपद्धती.**—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा.अधिनियम क्रमांक ६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१४) मध्ये दिलेल्या कारणांवरून, कुलपती कुलगुरूला, त्याच्या पदावरून दूर करू शकेल. उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१४) च्या खंड (घ), (ङ) किंवा (च) या अन्वये कुलगुरूला पदावरून दूर करण्यापूर्वी, यात या पुढे निर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण करण्यात येईल :—

**(१) प्रारंभिक चौकशी :—**

(क) कुलपतीचे, स्वाधिकार किंवा राज्य शासनाकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर किंवा कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यावर, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम १४ च्या खंड (घ), (ङ) किंवा (च) अन्वये कुलगुरूला पदावरून दूर करण्याचा अवलंब करण्यासाठी प्रथम दर्शनी प्रकरण आहे असे मत असेल तर, तो, कुलगुरूला पदावरून दूर करण्यासाठी, कोणतीही कारवाई सुरू करण्याबाबत, कोणतेही तात्पर्य आहे किंवा कसे याची खात्री करण्याकरिता करावयाची प्राथमिक चौकशी करण्याची व्यवस्था करू शकेल :

परंतु, कुलपतीस, निकडीच्या परिस्थिती नुसार प्राथमिक चौकशीची आवश्यकतेत सूट देण्याचा स्वेच्छानिर्णय असेल आणि तो, करावयाची सविस्तर चौकशी थेट करू शकतो.

(ख) कुलपतीस, अशा प्रकारची प्राथमिक चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकारी म्हणून, शासनाच्या उपसचिवाच्या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची आदेशाद्वारे नियुक्ती करता येईल.

(ग) चौकशी अधिकारी याप्रकरणी त्याला योग्य वाटेल अशी प्राथमिक चौकशी केल्यानंतर, त्याचा अहवाल तयार करील आणि कुलपतीद्वारे निर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या आत तो, कुलपतीस सादर करील.

(घ) कुलगुरूला पदावरून काढून दूर करण्याचा अवलंब करण्याकरिता प्रथम दर्शनी प्रकरण आहे असे प्राथमिक चौकशीत आढळून आले असेल तर, कुलपती, कुलगुरू वर केलेल्या आरोपांच्या बाबतीत नोटीशीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, त्याचे स्पष्टीकरण लेखी स्वरूपात सादर करण्याकरिता कुलगुरूला लेखी नोटीस देईल.

(ङ) जर कुलगुरूने, प्राथमिक चौकशीत त्याच्यावर केलेले आरोप मान्य केले तर, कुलपती, कुलगुरूला पदावरून दूर करण्याचा आदेश देईल.

(च) जर कुलगुरूने, त्याच्यावर केलेले आरोप मान्य केले नाहीतर, त्याची परिपूर्ण सविस्तर चौकशी करण्यात येईल :

परंतु, कुलपती, जर त्याला योग्य वाटले तर अशा सविस्तर चौकशीच्या कालावधीत, आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी त्याची कारणे नोंदविल्यानंतर, अशा लेखी आदेशाद्वारे, कुलगुरूला निलंबित करू शकेल. कुलपतीस, वेळोवेळी निलंबनाचा कालावधी वाढविता येईल :

परंतु, आणखी असे की, असा कोणताही निलंबनाचा आदेश काढण्यापूर्वी कुलगुरूला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

**(२) सविस्तर चौकशी :—**

कुलगुरू विरूद्धची सविस्तर चौकशी पुढील प्रमाणे करण्यात येईल :—

(क) कुलपती, कुलगुरूंवर ठेवलेल्या दोषारोपांची सविस्तर चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करील.

(ख) कुलपती, कुलगुरूवर ठेवलेल्या दोषारोपांच्या तपशीलवार विवरणपत्राची प्रत आणि दस्तऐवजांची व साक्षीदारांची यादी कुलगुरूला देण्याची व्यवस्था करील. कुलपती, लेखी नोटीसीद्वारे अशा नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत

कुलगुरूला, त्याच्या बचावाचे लेखी निवेदन त्याच्याकडे सादर करण्यास आणि त्याची व्यक्तीशः सुनावणी करण्याची इच्छा आहे किंवा कसे हे सांगण्यास फर्मावील.

(ग) चौकशी अधिकारी, जर कुलगुरूची व्यक्तीशः सुनावणी करण्याची इच्छा असेल तर, त्यास व्यक्तीशः सुनावणी करण्याची संधी देईल. चौकशी अधिकारी, त्याला योग्य वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर दोषारोपांची चौकशी करील आणि प्रत्येक दोषारोपावर त्याचे निष्कर्ष नोंदवील.

(घ) कुलपती, चौकशी अधिकाऱ्यासमोरील दोषारोपांच्या पुष्टयर्थ प्रकरण सादर करण्यासाठी "सादरकर्ता अधिकारी" म्हणून संबोधण्यात यावयाच्या शासकीय कर्मचाऱ्याची किंवा विधि व्यवसायाची, आदेशाद्वारे, नियुक्ती करू शकेल.

(ङ) कुलगुरू, त्याच्या वतीने प्रकरण सादर करण्यासाठी विधि व्यवसायीची नेमणूक करू शकतो.

(च) चौकशी संपल्यानंतर, चौकशी अधिकारी, प्रत्येक दोषारोपाच्याबाबतीत पुराव्याचे निर्धारण आणि त्याच्या कारणांसह प्रत्येक दोषारोपांचे निष्कर्ष यांचा अंतर्भाव असलेला अहवाल तयार करील.

(छ) चौकशी अधिकारी, कुलपतीला चौकशी अभिलेख सादर करील, त्या मध्ये त्याने तयार केलेला अहवाल, कुलगुरूने सादर केलेले कोणतेही असल्यास, बचावाचे लेखी निवेदन, चौकशी करताना, सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा, चौकशी करताना, सादरकर्ता अधिकाऱ्याने किंवा कुलगुरू किंवा दोघांनी दाखल केलेली कोणतीही असल्यास लेखी टाचणे, चौकशीच्या संबंधात त्याने दिलेला कोणताही असल्यास, आदेश यांचा समावेश असेल.

**(३) चौकशी अहवालावरील कारवाई :—**

(१) कुलपती, सविस्तर चौकशी अहवाल व चौकशीचा संपूर्ण अभिलेख विचारात घेतील आणि प्रत्येक दोषारोपांवरील त्याचे निष्कर्ष नोंदवील. जर तो, कोणत्याही दोषारोपांवरील चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांशी सहमत नसेल तर, अशा असहमतीची त्याची कारणे तो नोंदवील.

(२) जर कुलपतीची, सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही दोषारोपांवरील त्याचे निष्कर्ष विचारात घेतल्यानंतर आणि चौकशी मध्ये सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे, कुलगुरूंना पदावरून दूर करावे अशी खात्री पटली असेल तर, तो, आदेशाद्वारे, कुलगुरूंना पदावरून दूर करील.

**(४) आदेश कळविणे :—**

कुलगुरूला पदावरून दूर करण्यासाठी कुलपतीने काढलेला आदेश, चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालाची प्रत व कोणतीही असल्यास, त्याची सहपत्रे आणि जर, कुलपतीच्या निष्कर्षांचे विवरणपत्र यांसह कुलगुरूला कळविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित बाविस्कर,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.